# बाबूराव पेंटर : चित्रपटांना साहित्याची वाट दाखवणारे दिग्दर्शक

विजय चोरमारे

साहित्य आणि चित्रपट यांच्यातील अनुबंधाचा विचार करतो तेव्हा मराठीतील अलीकडच्या काळातील काही महत्त्वाचे चित्रपट नजरेसमोर येतात. आनंद यादव यांच्या नटरंग कादंबरीवरील‘नटरंग’ हा अलीकडच्या काळातील लक्षात राहिलेला सिनेमा. व्यंकटेश माडगूळकर यांची ‘बनगरवाडी’ ही मराठी साहित्यातील अत्यंत वाचकप्रिय कादंबरी. पन्नासच्या दशकातील या कादंबरीवर चित्रपट काढण्याचे स्वप्न अनेक नामवंत दिग्दर्शकांनी पाहिले, परंतु अमोल पालेकर यांना ती संधी मिळाली, ती तब्बल चार दशकांनी. काळ बदलला असला तरी अमोल पालेकर यांनी‘बनगरवाडी’ हा नितांतसुंदर चित्रपट बनवला होता. जी. ए. कुलकर्णी यांच्या ‘कैरी’ या कथेवर आधारित त्याच नावाचा आणखी एक सुंदर चित्रपट अमोल पालेकर यांनी बनवला आहे. म. गो. पाठक यांनी ‘लक्ष्मीबाई भ्रतार वासुदेव’ या आपल्या कादंबरीवर त्याच नावाचा बनवलेला चित्रपटही लक्षात राहण्याजोगा होता. सुहास शिरवळकर यांच्या ‘दुनियादारी’ कादंबरीवरील त्याच नावाच्या चित्रपटाने मराठीतील उत्पन्नाचे विक्रम प्रस्थापित केले, ही अगदी अलीकडची गोष्ट आहे.

<u>कॅमेरा बनवणारे बाबूराव पेंटर</u>

साहित्यकृतींवरून चित्रपट निर्मिती करण्याच्या अशा प्रयत्नांच्या मुळाशी जाताना ही सुरुवात कुठून झाली, याचा शोध घेतला तर तो धागा थेट बाबूराव पेंटर यांच्यापर्यंत जातो.

भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ दादासाहेब फाळके यांनी रोवली आणि १९१३ साली ‘राजा हरिश्चंद्र’च्या रुपाने पहिला भारतीय मूकपट दिला. बाबूराव पेंटर आणि आनंदराव पेंटर हे बंधू भारतातील या नव्या कलेच्या आगमनाचे साक्षीदार होते. दोघांनी चित्रपट निर्मितीचे स्वप्न पाहिले होते, परंतु दुर्दैवाने १९१६ साली आनंदरावांचा मृत्यू झाला. काही दिवसांनी बाबूरावांना मुंबईला गंधर्व नाटक मंडळींचे पडदे रंगविण्याचे काम मिळाले. गंधर्वांनी बरे पैसे दिल्याने कोल्हापुरात परतल्यानंतर फिल्म कॅमेऱ्याचा प्रयोग बाबूराव पेंटर यांनी सुरू केला. जे फिल्म प्रोजेक्टरचे तत्त्व तेच कॅमेऱ्याचे असले पाहिजे, अशी कल्पना बाबूरावांना सुचली आणि त्या तत्त्वावर कॅमेरा निर्मितीसाठी धडपड सुरू झाली. केशवराव धायबर यांनी ‘एका जिंदगीची पटकथा’ या आपल्या आठवणीवजा पुस्तकात पृष्ठ १६वर म्हटले आहे की, ‘कॅमेऱ्याला लागणाऱ्या चक्राला किती दात असावेत, यावर भवती न भवती सुरू झाली. दामलेमामा यांनी विचारांती व हिशोब करून गणित सोडवलं. गणित तर सुटलं. पण या कॅमेरा चक्राचा घेर काय असावा, अशी अडचण पडली. कारण या चक्राचा घेर काढण्याचं साधन मिळेना. तेव्हा ठरलं की, निरनिराळ्या आकाराची चक्रं ओतून त्याला दाते पाडावेत. हे ठरलं खरं. परंतु चक्र ओतून काढण्यासाठी भट्टी पाहिजे. शिवाजी थिएटर भाड्यानं घेतलं. भट्टी तयार झाली. चक्र ओतण्याचं काम सुरू झालं. चक्रं ओतून झाली, पण ठराविक दाते काही पडेनात. मात्र, एके दिवशी एका चक्रानं यश दिलं. तेव्हा सूर्य हाती आल्यासारखं झालं सर्वांना. या सर्व प्रयत्नाला बरेच दिवस खर्ची घालावे लागले आणि मग कॅमेरा तयार झाला.’

१९१८ सालाच्या मध्यानंतर चित्रपट निर्मितीस उपयोगी पडणारा कॅमेरा तयार करण्यात बाबूरावांना यश आले. या कॅमेऱ्यावर शूटिंगच्या ट्रायल्स यशस्वी झाल्याने या मंडळींचा आत्मविश्वास वाढला. १ डिसेंबर १९१७ रोजी आनंदरावांचा फोटो ठेवून मित्रमंडळींच्या उपस्थितीत

बाबूराव पेंटर यांनी महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या स्थापनेची घोषणा केली. पुढे २-३ महिन्यांत कॅमेऱ्यावर समाधानकारक ट्रायल्स घेतल्यावर १९१८ मध्ये मुंबईला भरलेल्या काँग्रेसच्या विशेष अधिवेशनाचे चित्रीकरण बाबूरावांनी केले. चित्रपटासाठी भांडवल उपलब्ध झाल्यानंतर त्यांनी 'सैरंध्री'चित्रपटाची तयारी सुरू केली. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'कीचकवध' नाटकावर आधारित हा चित्रपट होता.

कादंबरीवरील आद्य चित्रपट सिंहगड

सुरुवातीला दोन पौराणिक आणि एक सामाजिक विषयावरील चित्रपट घेतल्यानंतर बाबूरावांनी ऐतिहासिक विषयावरील चित्रपट घ्यायचे ठरवले. त्यासाठी ह. ना. आपटे यांची 'गड आला पण सिंह गेला' ही कादंबरी निवडली. ही कादंबरी महाराष्ट्रात खूप वाचली गेली होती, त्यामुळे त्यावरील चित्रपटाची कल्पना अनेकांना आवडली. एखाद्या कादंबरीवर आधारित चित्रपट काढण्याचा हा भारतातील पहिला प्रयोग असावा. आणि हा प्रयोग साकारला होता बाबूराव पेंटर यांनी १९२३ साली. जेव्हा चित्रपटकला बाल्यावस्थेत होती. चित्रपट आणि साहित्याचे नाते असते हे बाबूरावांनी पहिल्यांदा जाणले. बाबूरावांचे शिक्षण फार झाले नसले तरीही त्यांचे वाचन चांगले होते आणि चित्रपटकलेचे ज्ञान त्यांनी अनुभवातून आत्मसात केले होते. त्यामुळे दोन्हींचा अनुबंध त्यांनी जाणला होता. त्याअर्थाने 'सिंहगड' हा भारतातील कादंबरीवरचा पहिला चित्रपट म्हणता येईल.

बाबूराव पेंटरांचा ओढा साहित्यकृतींकडेच

पुढे बाबूराव पेंटर यांनी ना. ह. आपटे यांच्या 'लांच्छित चंद्रमा' या ऐतिहासिक कादंबरीवरून 'राणा हमीर' हा चित्रपट बनवला. बाबूरावांनी त्यासाठी ना. ह. आपटे यांना पत्र पाठवून कोरेगावहून बोलावून घेतले. कादंबरीच्या अनुषंगाने बाबूराव प्रसंग सुचवीत आणि ना. ह. आपटे ते लिहून काढत. ना. ह. आपटे यांच्या 'हृदयाची श्रीमंती' या कादंबरीवर बाबूरावांनी 'प्रतिभा' हा बोलपट बनवला. हा चित्रपट व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाला नसला तरी हिंदी चित्रपटांचे प्रेमकथेचे जे सूत्र आहे, ते इथपासून सुरू झाले, असे मानले जाते.

पुढे मराठी, हिंदी, बंगालीसह विविध भाषांमध्ये चित्रपट बनवताना साहित्यकृतींचा आधार घेण्यात आला. साहित्यकृतींवर बनवलेल्या सगळ्या चित्रपटांना व्यावसायिक यश मिळाले नसले तरी अशा चित्रपटांची जाणकार रसिकांनी आवर्जून दखल घेतली.

शरद्चंद्र, प्रेमचंद, शेक्सपिअर ते चेतन भगत

शरद्चंद्र यांची देवदास ही प्रसिद्ध कादंबरी. त्यावर आधारित त्याच नावाचे तीन चित्रपट पी. सी. बारुआ (१९३६), बिमल रॉय (१९५५), संजय लीला भन्साळी (२००२) यांनी काढले. अनुराग कश्यपने काढलेला 'देव डी' हा चित्रपटही (२००९) त्याच कादंबरीवर बेतलेला होता. परिणिता, मंझली दीदी हेही शरद्चंद्रांच्याच कादंबरीवरील चित्रपट.

शरद्चंद्रांप्रमाणेच प्रेमचंद यांचे साहित्य चित्रपटकर्त्यांना सातत्याने खुणावत राहिले. प्रेमचंद १९३४ साली मुंबईत आले, त्यानंतर त्यांनी सर्वप्रथम 'मजदूर' हा चित्रपट लिहिला. त्याशिवाय प्रेमचंद यांच्या साहित्यावर निघालेल्या महत्त्वाच्या चित्रपटांमध्ये हीरा मोती (१९५९), गोदान (१९६३), गबन (१९६६), शतरंज के खिलाडी (१९७७) आणि सद्गती (१९८१) यांचा समावेश होतो. खरेतर प्रेमचंदांच्या साहित्यकृतींवर १९३४ मध्ये 'नवजीवन' आणि 'सेवासदन' हे दोन चित्रपट बनवले गेले, परंतु ते अपयशी ठरले. १९४१मध्येही ए. आर. कारदार यांनी प्रेमचंद यांच्या 'त्रिया चरित्र' कथेवर बनवलेला 'स्वामी' चित्रपट अपयशी ठरला, पुढे १९४६ मध्ये प्रेमचंदांच्या 'रंगभूमी' कादंबरीवर तयार झालेल्या त्याच नावाच्या चित्रपटाचीही तशीच गत झाली.

जगभरातील साहित्य, नाट्यप्रेमींना भुरळ घालणाऱ्या शेक्सपिअरच्या कथानकांनी भारतातील अनेकांना वेड लावलं नसेल तर नवल ! शेक्सपिअरच्या

'कॉमेडी ऑफ एरर्स' वर आधारित 'दो दूनी चार'(१९६८) आणि अंगुर (१९८२) असे दोन हिंदी चित्रपट आलेले दिसतात. 'मॅकबेथ'वर आधारित मकबूल (२००३), 'ऑथेल्लो'वरचा ओंकारा (२००६) आणि 'हॅम्लेट'वरचा 'हैदर 'हे अगदी अलीकडचे महत्त्वाचे चित्रपट आहेत. शेक्सपिअरप्रमाणेच मारिओ पुझोच्या 'गॉडफादर' कादंबरीनेही अनेकांना भुरळ घातली. फिरोझ खाननं काढलेला 'दयावान' असेल किंवा रामगोपाल वर्माचा'सरकार', या दोन्हींचा आधार गॉडफादर कादंबरीच होती.

अगदी अलीकडे यायचे तर चेतन भगतची बरोबरी कुणी करू शकणार नाही. थ्री इडियट्स (फाइव्ह पॉइंट समवन), काइ पो चे (थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाइफ) आणि टू स्टेट्स (टू स्टेस्ट : द स्टोरी ऑफ माय मॅरेज), हाफ गर्लफ्रेंड (हाफ गर्लफ्रेंड) हे त्याच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपट आधुनिक भारतातल्या नव्या पिढीची नस अचूकपणे पकडणारे ठरले.

## समारोप

महत्त्वाचे साहित्यिक, त्यांच्या महत्त्वाच्या कलाकृती आणि त्यावर बनवले गेलेले आणि बऱ्यापैकी चर्चा झालेल्या चित्रपटांची वर काही वानगीदाखल उदाहरणे दिली आहेत. वरील सर्व विवेचनांवरून असे लक्षात येईल की सव्वाशे वर्षांची परंपरा असलेली भारतीय चित्रपटसृष्टी समृद्ध करण्यामध्ये, चित्रपटासाठी सकस कथानके पुरवण्यामध्ये साहित्यकृतींचा वाटा मोलाचा राहिला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीने साहित्याकडून खूप काही घेतले आहे आणि चित्रपटांनीही साहित्याला मोठ्या वाचकवर्गापर्यंत पोहोचवले आहे. भारतापुरते बोलायचे, तर या अनुबंधाचा प्रारंभ बाबूराव पेंटर यांनी केला. ह. ना. आपटे यांच्या गड आला पण सिंह गेला या कादंबरीवरून त्यांनी सिंहगड हा पहिला चित्रपट बनवला. त्यामुळे चित्रपटसृष्टीला साहित्याची वाट दाखवणारे पहिले दिग्दर्शक म्हणून बाबूराव पेंटर यांनाच श्रेय द्यावे लागेल.

## संदर्भ

१) धायबर केशवराव (१९६७): एका जिंदगीची पटकथा, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
२) पाटील दिनकर द. (१९८८): रुपेरी पडदा तंत्र आणि मंत्र, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई.
३) फडके ना. सी. (१९५४): बाबूराव पेंटर व्यक्ती आणि कला, अंजली प्रकाशन, कोल्हापूर.
४) भिडे ग.रं., गजबर बाबा (१९७८): कलामहर्षी बाबूराव पेंटर, मीनल प्रकाशन, कोल्हापूर.
५) महाम्बरे गंगाधर (१९७०): मौनांकित (दादासाहेब फाळके यांचे चरित्र) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६) मांडरे चंद्रकांत (लेखक : चोरमारे विजय) (२००५): देवाशपथ खरं लिहीन,अमेय प्रकाशन पुणे.
७) मांडरे सूर्यकांत (१९९५): विश्वकर्मा, पुरंदरे प्रकाशन पुणे.